# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८६ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१६७० : कोंडाणा किल्ला लढविताना नरवीर तानाजी मालुसरे धारातिर्थी पडले.

१९४४ : चलो दिल्ली चा नारा देत आझाद हिंद सेनेने दिल्लीकडे कूच केली.

१९८४ : पुण्यात शनिवारवाड्यासमोर थोरले बाजीराव पेशवे यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण जनरल अरुणकुमार वैद्य यांनी केले.

सेन्सेक्स ८३,७३९.१३ +२,०७२.६७ (२.५४%)

डॉलर ₹ ९०.२२

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १७ |
| दिल्ली | २२ | १० |
| मुंबई | ३६ | २१ |
| नागपूर | ३० | १६ |
| पुणे | ३२ | १३ |

**सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका; तुमच्या आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी सुद्धा शक्य होऊ शकतात.

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-७:०४ | संध्या-६:२० |

**सोने – चांदी**

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५५,४७०/- | २,८०,०००/- |

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०

पिल बाग : ११०१ ते ११०२

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### सुनेत्रा पवारांकडे पुणे, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद

मुंबई । राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर सुनेत्रा पवारांना आणखी दोन जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. सुनेत्रा पवार आता बीड आणि पुणे या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्री असणार आहेत. हे दोन्ही जिल्हे अजित पवारांकडे होते. आता त्यांच्या पश्चात सुनेत्रा पवारांकडे ही जबाबदारी देण्यात आली आहे. २८ जानेवारी रोजी अजित पवारांचं अपघाती निधन झालं. मुंबईहून बारामतीला येत असताना विमानाचा अपघात झाला. या अपघातात त्यांचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्यासह विमानात असलेल्या पाचही प्रवाशांचा मृत्यू झाला. यामध्ये त्यांचे सुरक्षा रक्षक, दोन पायलट आणि एका फ्लाइट अंटेडंटचा समावेश आहे.

### लोकसभेत आठ खासदारांचं निलंबन


नवी दिल्ली । राहुल गांधी यांनी लोकसभेत माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील उल्लेखावरून सत्ताधाऱ्यांना घाम फोडलेला असताना आज अमेरिकेबरोबर भारताने व्यापार करार केल्यावरून राहुल गांधींनी आवाज उठवला. या प्रश्नी राहुल गांधींचं समर्थन करणाऱ्या खासदारांनाच निलंबित करण्यात आलं आहे. लोकसभेने आज विरोधी पक्षातील आठ खासदारांना निलंबित केलं आहे. या खासदारांनी लोकसभेत कागदपत्रे भिरकावली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आज दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं आहे. तसंच, निलंबित करण्यात आलेल्या आठ खासदारांमध्ये महाराष्ट्रातील एका खासदाराचाही समावेश आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावरून फडणवीस-शरद पवारांमध्ये दावे-प्रतिदावे

## अजित पवारांच्या निधनानंतर विलीनीकरणाचा वाद विकोपाला

वृत्तसंस्था । मुंबई

**अजित पवारांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावरून चर्चा सुरू आहे. त्यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांमधील संभाव्य विलीनीकरणाबाबत दावे–प्रतिदावे केले जात आहेत. आता या प्रकरणाला मोठे राजकीय स्वरूप प्राप्त झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या वादात उडी घेतल्याने राजकारण अधिकच तापले आहे. विलीनीकरणाची शक्यता फडणवीस यांनी फेटाळून लावल्यानंतर, राष्ट्रवादी (शदरचंद्र पवार) पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी फडणवीसांना कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले.**



विलीनीकरण ही दोन्ही राष्ट्रवादी गटांची अंतर्गत बाब आहे, अशी भूमिका फडणवीस सातत्याने मांडत आले आहेत. मात्र, रविवारी त्यांनी या विषयात हस्तक्षेप केला. या विषयावर कोणतीही चर्चा झाली असती तर अजित पवारांनी आपल्याला त्या घडामोडींची कल्पना दिली असती, असे फडणवीस यांनी म्हटले. यावर राष्ट्रवादीचे अध्यक्ष म्हणाले, जेव्हा तुम्ही या चर्चेचा भागच नव्हता, तेव्हा तुम्हाला विलीनीकरणाबद्दल कसे काय माहीत असेल? देवेंद्र फडणवीसांच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यातील हस्तक्षेपाकडे भाजपाची रणनीती म्हणून पाहिले जात आहे. मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादीने अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांतच त्यांच्या पत्नी, राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांना राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्रिपदी बसवण्याचा निर्णय घेतल्यानंतर भाजपा जोरदार बचाव करताना दिसत आहे. मात्र, भाजपाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फडणवीस यांचे विधान हे सत्ताधारी महायुतीमध्ये आपले वर्चस्व पुन्हा सिद्ध करण्याचे माध्यम होते. एका सूत्राने सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली कोणालाही माफी नाही. आपल्या अपमानाचा बदला घेण्याचे पक्षाने ठरवले होते. हे विधान २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर पहाटेच्या शपथविधी सोहळ्यात स्थापन झालेल्या सरकारचा संदर्भ देऊन करण्यात आले आहे. त्यावेळी (पान २ वर)

### ➤ विलीनीकरणाबाबत अजित पवार गटातील नेते चिंतेत

२०२३ च्या फुटीनंतर जे नेते अजित पवारांबरोबर राहिले, त्यांच्यापैकी अनेकांकडे सध्या मंत्रिपदे किंवा महत्त्वाची संघटनात्मक पदे आहेत. विलीनीकरण झाल्यास शरद पवार गटातील नेत्यांना यातील काही पदे देणे भाग पडेल, ज्यामुळे मंत्रिमंडळ आणि पक्ष संघटना या दोन्ही ठिकाणी फेरबदल करावे लागतील. वरिष्ठ नेत्यांच्या मते, यामुळे आपले स्थान किंवा प्रभाव कमी होईल, अशी भीती संबंधित नेत्यांमध्ये निर्माण झाली आहे. एकत्रीकरणामुळे जयंत पाटील, अनिल देशमुख यांच्यासारखे नेते पुन्हा पक्षीय कारभाराच्या केंद्रस्थानी येतील. फुटीनंतर यातील अनेक नेते विरोधी पक्षात गेले होते आणि आता ते संयुक्त पक्ष तसेच सरकारमध्ये महत्त्वाच्या भूमिकेसाठी प्रयत्न करतील. अजित पवारांच्या उपस्थितीत एकत्रीकरणाला विरोध न करणारे राष्ट्रवादीतील अनेक नेते आता त्यांच्या अनुपस्थितीत नवीन नेत्यांना सामावून घेण्याविरुद्ध आक्रमकपणे बोलू लागले आहेत.

### ➤ दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावरून वादंग

२०२३ मध्ये अजित पवार एनडीएमध्ये सामील झाल्यापासून विलीनीकरणाचा मुद्दा राज्याच्या राजकारणात चर्चेत होता. पवार कुटुंब आज ना उद्या एकत्र येईलच, असे दोन्ही गटांतील नेते वारंवार म्हणायचे. मात्र, अजित पवारांच्या आकस्मिक निधनाने विलीनीकरणाच्या चर्चेला खीळ बसली आहे आणि दोन्ही गटांतील नेते आता एकमेकांवर आरोप–प्रत्यारोप करत आहेत. राष्ट्रवादीचे (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर आरोप केला की, अजित पवारांचे सुतक संपण्यापूर्वीच त्यांना पक्षाचा ताबा घेण्याची घाई झाली होती. यावर प्रत्युत्तर देताना राज्याचे मंत्री छगन भुजबळ म्हणाले, पक्षाला वाऱ्यावर सोडता येणार नाही. ज्यांचे अजितदादांवर प्रेम होते, त्यांना सुनेत्रा वहिनींनी पक्षाची आणि सरकारची जबाबदारी स्वीकारावी असेच वाटत होते. परंतु, सुनील तटकरे यांनी विलीनीकरणाच्या कोणत्याही चर्चेची माहिती असल्याचे नाकारले. अशी काही चर्चा असती तर अजितदादांनी मला नक्कीच सांगितले असते. भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएमध्ये सहभागी होण्याचा निर्णय राष्ट्रवादीने एकत्रितपणे घेतला होता आणि आमच्याकडे लोकांचा कौल आहे, असे ते म्हणाले.

# वैद्यकीय अधीक्षकाचे प्रमाणपत्र निघाले बोगस

- निवृत्तीनंतर प्रकार उघडकीस, गुन्हा दाखल

वृत्तसंस्था । मुंबई

**लाक्षणिक अपंगत्व नसताना अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवून शासकीय सेवेतील लाभ घेतल्याप्रकरणी ईश्वरपूरचे (जि. सांगली) निवृत्त वैद्यकीय अधीक्षकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत दाखल झालेला राज्यातील पहिला गुन्हा ठरला आहे.**

शासकीय, निमशासकीय सेवा, योजना व सुविधांचे लाभ घेणाऱ्या अपंगांना दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक अपंग ओळखपत्र बंधनकारक करण्यात आलेले आहे. तत्कालीन इस्लामपूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रघुनाथ राजराम भोई यांनी अपघातामध्ये अपंगत्व झाल्याने दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळवले होते. त्याआधारे त्यांनी शासकीय सेवेतील सोई सुविधांचा लाभ घेतला होता.

२०१८ मध्ये अपंगांना वैश्विक ओळखपत्राची (युडीआयडी) पडताळणी सक्तीची करण्यात आली. अपंगत्वाच्या शासकीय लाभासाठी लाक्षणिक अपंगत्व (४० टक्के) असणे गरजेचे आहे. मात्र डॉ. भोई यांचे अंपगत्व केवळ १५ टक्के निघाले. त्यामुळे कोल्हापूर मंडळाचे आरोग्य उपसंचालक यांनी डॉ. भोई यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार डॉ. भोई यांच्यावर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ९१ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

शासकीय व निमशासकीय सेवेत व पदोन्नतीमध्ये लाक्षणिक अपंगांना ४ टक्के आरक्षण आहे. त्याचा लाभ उठवत अनेकांनी बनावट प्रमाणपत्र मिळवत नोकऱ्यात शिरकाव केलेला आहे. याला चाप लावण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी ऑक्टोबरमध्ये शासनाच्या सर्व विभागांना अपंग कोट्यातील शासकीय लाभधारकांच्या प्रमाणपत्राचे नुतनीकरण व वैश्विक ओळखपत्र पडताळणीचे आदेश दिलेले आहेत.लाक्षणिक अपंग नसतानाही बनावट प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये जिल्हा परिषद शिक्षकांची मोठी संख्या आहे. बोगस अपंगांच्या विरोधात आजपर्यंत गुन्हे नोंद (पान २ वर)



**दिव्यांगांसाठी असलेले लाभ फसवणुकीने मिळवणे हा गुन्हा आहे. यामुळे शासनाची फसवणूक होते आणि खऱ्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या हक्काच्या लाभांपासून वंचित राहावे लागते. दिव्यांगांसाठीच्या लाभांचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे.**

**– तुकाराम मुंढे,**
सचिव, दिव्यांग कल्याण विभाग.

## मालकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हा, मोठा दंडही ठोठावला जाणार

# ...आता बालमजुरी महागात पडणार

वृत्तसंस्था । मुंबई

**बालमजुरी ही अनिष्ट प्रथा कायमस्वरुपी दूर करून बालमजुरांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात समाविष्ट करून त्यांचे आवश्यकतेनुसार पुनर्वसन करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हास्तरीय बालकामगार कृती समितीची स्थापना करण्यात आली असून, त्यांची कार्यपद्धतीही ठरविण्यात आलेली आहे.**

विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांचे स्तरावर कार्यपद्धती याबाबत अभ्यास करण्यासाठी विषयवार समित्या स्थापन केल्या होत्या. महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखाली गठीत विविध समित्यांचा आढावा घेऊन सुसूत्रीकरण करण्यासाठी शिफारशीही करण्यात आल्या.जिल्हास्तरीय बालकामगार कृती समितीचे कर्तव्य व जबाबदाऱ्याही ठरविण्यात आलेल्या आहेत. जिल्हाधिकारी तथा (पान २ वर)




**➤ बालकामगार आढळून आल्यास कसूरदार मालकांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून मालकांकडून प्रत्येक बाल कामगारामागे २० हजार रुपयांची दंड वसुलीची कारवाई केली जाणार आहे. जोखमीच्या व्यवसायातून मुक्त केलेल्या बाल कामगारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

# वाहतूक नियम पाचवेळा मोडल्यास वाहनाची नोंदणीच रद्द

## वाहन चालवण्याचा परवानाही होणार कायमचा बाद

वृत्तसंस्था । नागपूर

**केंद्र सरकारने केंद्रीय मोटार वाहन कायदा, १९८९ मध्ये दुरुस्ती केल्याने वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. नवीन तरतुदीनुसार एका वर्षात पाच वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित वाहनाची नोंदणी तसेच चालकाचा वाहनचालक परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाईल.**



वाढते रस्ते अपघात आणि बेशिस्त वाहनचालकांमुळे जाणारे निष्पाप जीव वाचवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचा सरकारचा दावा आहे.

नवीन नियमानुसार वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्यानंतर दंड आकारला गेल्यास, तो भरण्यासाठी किंवा त्यावर आक्षेप नोंदवण्यासाठी चालकाला ४५ दिवसांचा अवधी दिला जाईल. या कालावधीत (पान २ वर)

# पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

- संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारार्थ येथे आलेल्या होत्या

वृत्तसंस्था । छ. संभाजीनगर

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्याचे मंगळवारी येथे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांचे पुढील दौऱ्यासाठी होणारे उड्डाण काही काळ येथे रखडले होते.**



**पंकजा मुंडे यांच्या लातूर जिल्ह्यात तसेच धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीच्या संदर्भाने जाहीर सभा असून सायंकाळी त्या सोलापूरमध्ये मुक्कामी पोहोचणार होत्या. आता त्यांचा दौरा काहीसा उशिराने सुरू होईल. मात्र त्या सोलापूरमध्ये मुक्कामी पोचतील, असे त्यांच्या काही कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले.**

राज्याच्या पर्यावरणमंत्री तथा भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे या सोमवारी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारार्थ येथे आलेल्या होत्या. सोमवारी त्यांच्या पिशोर, घाटनांद्रा, चौका, आडगाव, बजाजनगर आदी ठिकाणी सभा पार पडल्या. सोमवारी पंकजा मुंडे या छत्रपती संभाजीनगरमध्ये मुक्कामी होत्या. मंगळवारी सकाळी पंकजा मुंडे या लातूर, धाराशिव व सोलापूर या तीन जिल्ह्यातील त्यांच्या नियोजित सभांसाठी हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा विमानतळावरून निघण्याच्या तयारीत होत्या. सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास त्यांचा पुढील नियोजित दौरा निश्चित होता. या दौऱ्यासाठी (पान २ वर)

### लाडकी बहीण योजनेला अजितदादांचे नाव द्या

वृत्तसंस्था । अकोला

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीतून लाडकी बहीण योजना साकारण्यात आली होती. त्याची प्रभावी अंमलबजावणी अर्थमंत्री म्हणून त्यांच्या नियोजनातून करण्यात आली. आता त्यांच्या स्मृती जपण्यासाठी राज्यातील महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेला अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, असा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी ही मागणी करून संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे.

## संपादकीय

### संसदेतील नवीन वादंग

देशात अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर आणि त्याच्या बऱ्या वाईट परिणामावर चर्चा सुरू असतानाच आज संसदेत एक नवीनच वादंग उभे राहिले आणि त्यातून सरकार आणि राहुल गांधी यांच्यात नवीन संघर्ष उभा राहिलेला पाहायला मिळाला. आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी राहुल गांधी उभे राहिले त्यावेळी त्यांनी माजी लष्कर प्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी लिहिलेल्या एका पुस्तकातील संदर्भाचा उल्लेख करायला सुरुवात केली. त्यावेळी संपूर्ण सत्ताधारी पक्ष राहुल गांधींच्या विरोधात आरडा ओरड करीत उभा राहिला. गृहमंत्री, संरक्षण मंत्री, संसदीय कामकाज मंत्री आणि बाकीचे सगळेच मंत्री राहुल गांधींवर तुटून पडले आणि त्यांनी जनरल नरवणे यांच्या पुस्तकातील कुठलाही संदर्भ सभागृहात उपस्थित करायला कडाडून विरोध केला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनीही राहुल गांधी यांना सभागृहात याविषयीचा मुद्दा उपस्थित करण्यास मनाई केली. त्यातून सभागृहात जो गोंधळ निर्माण झाला त्यामुळे तीन वेळा कामकाज तहकूब करावे लागले. सायंकाळी चार वाजता जेव्हा कामकाज सुरू झाले त्यावेळीही राहुल गांधी यांनी हाच विषय उपस्थित करण्याचा प्रयत्न केल्यानंतर पुन्हा सत्ताधारी पक्षाने त्यांना आक्षेप घेतल्याने दिवसभरासाठीच हे कामकाज तहकूब करावे लागले आहे. भारत आणि चीन यांच्या अलीकडच्या काळात जो लष्करी संघर्ष निर्माण झाला त्यासंदर्भात नरवणे यांनी आपल्या पुस्तकात काही ठोस विधाने केली आहेत. ही विधाने सभागृहात मांडण्याचा प्रयत्न राहुल गांधी करत होते, परंतु त्यांना सत्ताधारी पक्षाने तसे करू दिले नाही. सत्ताधारी पक्षाचे म्हणणे असे होते की जनरल नरवणे यांचे पुस्तक अजून प्रकाशित व्हायचे आहे त्यामुळे त्याचा संदर्भ राहुल गांधी यांना या सभागृहात देता येणार नाही, मग राहुल गांधी यांनी या पुस्तकाचा जो संदर्भ एका मासिकात छापून आला आहे त्याचा उल्लेख करून हा विषय पुढे रेटण्याचा प्रयत्न केला त्यालाही सत्ताधारी पक्षाने आणि लोकसभेच्या सभापतींनी मनाई केली. कुठल्याही मासिकातल्या लिखाणाचा संदर्भ या ठिकाणी देता येत नाही असे नमूद करण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न होता. पण हा विषय राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित असल्याने आणि त्या संदर्भात देशाच्या माजी लष्कर प्रमुखांनी जबाबदारीने जी विधाने केली आहेत ती विधाने लोकांपुढे मांडणे आणि ती चर्चेला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे नमूद करीत राहुल गांधी यांनी आपला आग्रह कायम ठेवल्याने सरकार आणि राहुल गांधी यांच्यात एक नवीनच पेच निर्माण झालेला आज पाहायला मिळाला. सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर बाहेर पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी या पुस्तकातला काही संदर्भ निदर्शनास आणला. ते म्हणाले की चीनने सीमेवर भारताच्या विरोधात जेव्हा आक्रमक भूमिका घ्यायला सुरुवात केली त्यावेळी लष्कर प्रमुख या नात्याने जनरल नरवणे हे पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांना भेटले होते. त्यावेळी या दोघांकडून लष्कर प्रमुखांना या संघर्षाच्या स्थितीवर स्पष्ट निर्देश देण्याची अपेक्षा असताना उदासीनता दाखविली हे जनरल नरवणे यांच्या लिखाणातून निर्देशित होते आहे.

# सीसीटीव्ही नसलेल्या परीक्षा केंद्रांचे ड्रोनद्वारे होणार निरीक्षण

## केंद्र संचालकाच्या बैठकीत विभागीय सचिव मोहन देसले यांची माहिती



प्रतिनिधी । जळगाव

**शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहेत. ज्या केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे नसतील त्या केंद्रावर ड्रोनद्वारे परीक्षेचे निरीक्षण केले जाणार आहे. यासंदर्भात सर्व केंद्र संचालकांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करून विद्यार्थ्यांना भयमुक्त परीक्षा देण्याकरिता प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन नाशिक विभागीय परीक्षा मंडळाचे सचिव मोहन देसले यांनी केले.**

जिल्ह्यातील दहावी, बारावी केंद्र संचालकाची बैठक मंगळवार, दि.३ रोजी पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहसचिव डॉ.मच्छिन्द्र कदम, उपशिक्षणधिकारी सचिन परदेशी, रागिणी चव्हाण, डॉ.मिलिंद बागुल, शैलेश राणे उपस्थित होते.

पुढे बोलतांना देसले यांनी, मंडळ शिक्षासूची वाचन केल्याचे, कॉपी न करण्याची प्रतिज्ञा घेतल्याचे, मंडळाने तयार केलेला व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखवा, अशा सूचना केल्या. यामुळे कॉपीरहित परीक्षा होण्यास मदत होईल. मंडळाच्या सूचनांचे पालन करा, चुका टाळण्यासाठी पर्यवेक्षकांना सूचना द्या, बैठक घ्या, असे सांगून आपल्यावर आता मोठी जबाबदारी आहे ती व्यवस्थित पार पाडण्याचे आवाहन त्यांनी केले.

### • दक्षता समितीच्या निर्देशानुसार कार्यवाही करा

**सहसचिव डॉ.मच्छिंद्र कदम यांनी, परीक्षा पूर्व, परीक्षाकालीन व परीक्षोत्तर कामाचे नियोजन, स्टाफ नियुक्ती, दिव्यांग विद्यार्थी सवलती, दालन पर्यवेक्षक सभा, सीसीटीव्ही, जनरेटर, इतर सुविधा पूर्तता तसेच जिल्हा दक्षता समितीच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी कॉपी केस केल्यास त्याबाबतची कार्यवाही, डमी किंवा तोतया विद्यार्थी, अनुपस्थित, ऐनवेळी प्रविष्ठ विद्यार्थी, विद्यार्थी कॉपी साहित्य, इलेक्ट्रॉनिक गॅझेट न आणण्याबद्दल त्यांनी माहिती दिली. सूत्रसंचालन शैलेश राणे यांनी केले तर आभार रागिणी चव्हाण यांनी मानले.**

# भावी महापौरांचा जळगाव ते पद्मालय सायकलने प्रवास

## शहर विकासासाठी गणरायाला घातले साकडे

प्रतिनिधी । जळगाव



**शहराच्या भावी महापौर दीपमाला काळे यांनी मंगळवारी जळगाव ते पद्मालय असा सायकल प्रवास करत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनसेवेसाठी आपल्याला बळ मिळावे, असे साकडे त्यांनी गणरायाला घातले.**

दीपमाला काळे या नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ मधून बिनविरोध निवडून आलेल्या असून त्यांची महापौरपदी निवड निश्चित झाली आहे. महायुतीच्यावतीने त्यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांच्या नावावर पक्षाने शिक्कामोर्तब केले असून केवळ अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. या पार्श्वभूमीवर, मंगळवार, दि.३ रोजी दीपमाला काळे यांनी जळगाव सायकलिस्ट ग्रुपच्या सदस्यांसह जळगाव ते पद्मालय असा सायकल प्रवास करत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनसेवेसाठी आपल्याला बळ मिळावे, असे साकडे त्यांनी गणरायाला घातले.

# मोडी लिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

येथील मू.जे. महाविद्यालयाचा इतिहास विभाग व हेरिटेज संवर्धन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने दि.९ ते १४ फेब्रुवारीदरम्यान मोडी लिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. १२-१३ व्या शतकांपासून महाराष्ट्राच्या राजकीय व्यवहारात व लोक व्यवहारात रूढ असलेली मोडी लिपी अलीकडे कालबाह्य होऊ पाहत असून मोडी जाणकार तयार होणे आवश्यक असल्याने विद्यार्थ्यांसह इच्छुक व्यक्तिंकरिता नि:शुल्क मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे. ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या ह्युमॅनिटीज बिल्डिंगमधील रूम नंबर १२ मध्ये सकाळी ११ ते १२.३० या वेळेत होणार आहे. इच्छूकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. सं.ना. भारंबे यांनी केले आहे.

# अयोध्यानगरात घरफोडी करणाऱ्या दोघांना मध्यप्रदेशातून अटक

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील अयोध्यानगरात घरफोडी करुन सोन्याचे दागिने लांबविणाऱ्या दोघांना एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या पथकाने रविवारी (दि.१) मध्यप्रदेशातून अटक केली. त्यांच्याकडून चोरी केलेले १९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.**



पंढरीनाथ पाटील (रा. अयोध्यानगर) हे त्यांच्या परिवारासह धानवड येथे गेलेले असतांना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडीकोयंडा तोडून घरातील लाकडी कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने लंपास केले होते. दरम्यान, घरचा दरवाजा उघडा असल्याची माहिती शेजारच्यांनी पाटील यांना दिल्यानंतर त्यांनी घरी येवून पाहणी केल्यानंतर घरात चोरी झाल्याचे उघडकीस आले होते. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, पोनि बबन आव्हाड यांनी, पोउनि राहुल तायडे, चंद्रकांत धनके, पोहेकॉ किरण चौधरी, पोकॉ विशाल कोळी आदींचे पथक तयार करुन गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना केल्या होत्या. त्यानुसार तपासाची चक्रे फिरवीत सुखदेव रामसिंग टाक, आकाश दिनेश वाधे यांच्यासह एक विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेवून विचारपूस केल्यावर त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरी केलेले सोन्याचे दागिने, ४ लाख रुपये किमतीचे चारचाकी वाहनासह लोखंडी पकड, स्क्रु ड्रायव्हर, एक लहान चाकु असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# यशश्री कोष्टीची लिपिक पदावर नियुक्ती



प्रतिनिधी । जळगाव

येथील डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी यशश्री संतोष कोष्टी हिची मुंबई उच्च न्यायालयात लिपिक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे गौरव करण्यात आला.

प्राचार्य डॉ.आर.के. नारखेडे यांच्याहस्ते यशश्री हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करतांना यशश्रीने महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक आणि मार्गदर्शक शिक्षकांच्या प्रोत्साहनामुळेच हे यश मिळवू शकले. शिस्तबद्ध अभ्यासाच्या तयारीने आणि आत्मविश्वासामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी सुलभ झाल्याचे तिने सांगितले.

## पान १ वरुन

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या......**

शरद पवारांनी अजित पवारांची समजूत काढून त्यांना पुन्हा राष्ट्रवादीत परत आणले होते. त्यानंतर राष्ट्रवादीने शिवसेना आणि काँग्रेसबरोबर येऊन उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकार स्थापन केले. तेव्हा भाजपाला सर्वात मोठा पक्ष असूनही विरोधी बाकांवर बसावे लागले होते. दुसरीकडे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दावा केला आहे की, पक्षाने कोणावरही पक्षात येण्यासाठी दबाव टाकलेला नाही. मात्र, भाजपाच्या दुसऱ्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले की, २०२९ मध्ये महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता मिळवण्यासाठी आणि अमित शाह यांच्या 'शत प्रतिशत भाजपा'च्या आवाहनानुसार योजना आधीच आखल्या गेल्या आहेत. विशेषतः जेव्हा राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकमेकांवर विश्वास ठेवत नाहीत, तेव्हा भाजपा आपल्या मित्रपक्षांना ताकद का देईल? प्रादेशिक पक्षाची विभागणी भाजपाच्या फायद्याची आहे. मग आम्ही त्यांना नवसंजीवनी का देऊ? असा प्रश्न त्या नेत्याने केला आहे. या नेत्यांसाठी दुसरी चिंतेची बाब म्हणजे, पक्षाच्या धोरणांवर शरद पवारांचे पुन्हा वर्चस्व निर्माण होण्याची शक्यता. राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाल्यास शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचीच निर्णय प्रक्रियेत मुख्य भूमिका असेल. फुटीनंतर अजित पवार गटात ज्या नेत्यांचा उदय झाला, त्यांना आता शरद पवारांच्या नेतृत्वाखाली आपला प्रभाव कमी होईल असे वाटत आहे.

**वैद्यकीय अधीक्षकाचे......**

आहेत. पण, ते बनावट कागदपत्रासंदर्भातले आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमांतर्गत हा राज्यातला पहिला गुन्हा असून यामध्ये दोन वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद आहे. तसेच शासकीय लाभांची वसुली करण्यात येते. डॉ. भोई यांना २०११ मध्ये शासकीय सेवेत असताना अपघात झाला होता. त्यानंतर त्यांनी अपंग प्रमाणपत्र घेत शासकीय लाभ घेतले. डॉ. भोई हे निवृत्त झाल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. डॉ. भोई यांनी ज्या ईश्वरपूर येथे वैद्यकीय अधिक्षक म्हणून काम केले, तेथील विद्यमान वैद्यकीय अधिक्षकांनी त्यांच्यावर २९ जानेवारी रोजी गुन्हा नोंद केला आहे.

**वाहतूक नियम पाच......**

चालकाने दंड भरणे किंवा आपली बाजू संबंधित यंत्रणेकडे मांडणे आवश्यक आहे. अनेकांना किरकोळ नियम भंगाचे गांभीर्य वाटत नाही; मात्र आता सीटबेल्ट न लावणे, वाहतूक सिग्नल तोडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, हेल्मेट न वापरणे, अशा प्रत्येक उल्लंघनाची नोंद केली जाणार आहे. हे सर्व नियमभंग मोजले जातील आणि पाचव्यांदा उल्लंघन झाल्यास संबंधितावर कडक कारवाई करण्यात येईल. वाढत्या अपघातांची आकडेवारी लक्षात घेऊन केंद्रीय मोटार वाहन कायदा, १९८९ मधील तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. तांत्रिक पाळत ठेवून ही यंत्रणा राबवली जाणार आहे. दरम्यान, आता केवळ दंड भरून सुटका होणार नाही. नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या वाहनचालकांसाठी हा नवीन कायदा मोठा इशारा ठरणार आहे. रस्ते सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारने हे पाऊल उचलले आहे. एका वर्षात चालकाने पाच वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास त्याचा वाहनचालक परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाईल. यासोबतच संबंधित वाहनाची प्रादेशिक परिवहन कार्यालयातील नोंदणीही रद्द करण्यात येईल, त्यामुळे ते वाहन रस्त्यावर चालवणे बेकायदेशीर ठरेल. चुकीच्या कारवाई, वाहन चालकाला अपील करण्याची संधी - दरम्यान, एखाद्या चालकाला आपल्यावर चुकीच्या पद्धतीने कारवाई झाल्याचे वाटत असल्यास त्याला संबंधित प्राधिकरणाकडे अपील करण्याची संधी देण्यात येईल. ही प्रक्रिया पारदर्शक ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मात्र अपील फेटाळले गेल्यास किंवा चालकाने आपली चूक मान्य केल्यास ४५ दिवसांच्या आत दंड भरणे बंधनकारक असेल. दंड न भरता पुन्हा नियमभंग केल्यास कारवाईची प्रक्रिया अधिक वेगाने राबवली जाईल, अशी माहिती नागपुरातील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे......**

निघण्याची तयारी सुरू असताना त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक बिघाड असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मंत्री पंकजा मुंडे यांचे उड्डाण काही काळ रखडले. बिघाडाच्या हेलिकॉप्टरमधून प्रवास होऊ शकत नाही, असे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर मुंबई येथून दुसरे हेलिकॉप्टर मागवण्यात आल्याची माहिती पंकजा मुंडे यांचे निकटवर्तीय तथा भाजपचे कार्यकर्ते प्रवीण घुगे यांनी दिली.

**आता बालमजुरी......**

जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, नगरपरिषद मुख्याधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, सहायक पोलिस आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा आदिवासी विकास विभागाचे अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, होमगार्डस जिल्हा समादेशक, अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे दोन प्रतिनिधी आदींचा सदस्य तर सहायक कामगार आयुक्तांचा सदस्य सचिव म्हणून समितीत समावेश करण्यात आला आहे.बालकामगारांचे पालक बालकास मजुरी करण्यास पाठविणार नाहीत, याबाबत दक्षताही बाळगण्यात येणार आहे.बालकांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या काळात म्हणजेच त्यांना शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक असताना, काम करण्यास भाग पाडण्याच्या अनिष्ट प्रथेच्या निर्मूलनासाठी व्यापक जनजागृती केली जाणार आहे. बालकास बालमजुरीतून मुक्त केल्यानंतर अशा ठिकाणाजवळ शाळा, अतिरिक्त शिक्षण वर्ग, शैक्षणिक साहित्य या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात बाल कामगार या विषयासाठी एक स्वतंत्र कक्ष तयार करण्यात यावा, अशा सूचनाही कामगार विभागाकडून देण्यात आलेल्या आहेत.

# पारायण, महाशिवपुराण कथेचे आयोजन

**जळगाव ।** श्री गजानन महाराज यांच्या प्रगट दिनानिमित्त योगिराज श्री गजानन महाराज बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि.५ ते ७ दरम्यान दररोज दुपारी २ ते ५ ग्रंथ वाचन, सायंकाळी ६ ते रात्री १० दरम्यान ह.भ.प. देवदत्त महाराज मोरदेकर यांचे प्रवचन होणार आहे. दि.८ रोजी सकाळी ६ वाजता रुद्राभिषेक, ७ ते १२ दरम्यान पादुका पूजन, होमहवन, महाआरती, दुपारी १२ ते २ दरम्यान महाप्रसाद आणि सायंकाळी ४ ते ८ दरम्यान पालखी मिरवणूक, महाआरती आणि दीपोत्सव होणार आहे.

# नियोजन समितीच्या बैठकीत ७५१ कोटींच्या आराखड्यास मंजुरी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा नियोजन समितीची बैठक सोमवारी (दि.२) पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठी ७५१ कोटी ७० लक्ष रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी देण्यात आली. तसेच चालू आर्थिक वर्षातील ८३४ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीच्या खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये ६१८.९९ कोटी रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या.**



आर्थिक वर्ष संपण्याआधी तातडीने उर्वरित कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच कामे दर्जेदार पध्दतीने पुर्ण करुन संपूर्ण निधी वेळेत खर्च करण्याचे निर्देश ना. गुलाबराव पाटील यांनी दिले.

यामध्ये सर्वसाधारण ६७७ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनांसाठी ९३ कोटी तर आदिवासी उपयोजनेसाठी ६४ कोटी ६२ लक्ष इतक्या निधीचा समावेश आहे. जळगाव जिल्हा निधी खर्च करण्यांमध्ये तसेच प्रशासकीय मान्यता देण्यामध्ये विभागात पहिल्या क्रमांकावर असल्याचेही ना.गुलाबराव पाटील यांनी यावेळी सांगितले.

बैठकीला जलसंपदामंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार चंद्रकांत सोनवणे, आमदार अनिल पाटील, आमदार चंद्रकांत पाटील, आमदार अमोल पाटील, आमदार किशोर पाटील, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# जिल्ह्यात १४ पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी

प्रतिनिधी । जळगाव

जिल्ह्यातील आगामी राजकीय हालचाली व कायदा-सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात दि.३० जानेवारी रोजी रात्री १२ वाजेपासून ते १४ फेब्रुवारी रोजीच्या रात्री १२ वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था व महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका प्रलंबित आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यात ग्रामीणस्तरावर राजकीय हालचालीना वेग आला असून पक्षांतर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. याअनुषंगाने सार्वजनिक शांतता अबाधित राखण्यासाठी हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. या कालावधीत शस्त्र, दाहक व स्फोटक पदार्थ बाळगणे, दगडफेक, प्रतिकात्मक दहन, अश्लील वा शांतता भंग करणारी भाषणे-हावभाव तसेच दहन तसेच पोलीस अधिक्षकांच्या पुर्व परवानगीशिवाय सभा घेण्यास किंवा मिरवणुका काढण्यास बंदी घालण्यात आली आहे.

हा आदेश शासकीय कार्यक्रम, अंत्ययात्रा, लग्न व धार्मिक मिरवणुकांना तसेच कर्तव्यावर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही, असे अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# ५३ दिवसांच्या लढ्यानंतर महिला रुग्णांची जीबीएसवर मात

प्रतिनिधी । जळगाव

**दुर्मिळ व जीवघेण्या गुइलेन-बारे सिंड्रोम या आजाराशी झुंज देणाऱ्या तनुजा तडवी यांनी तब्बल ५३ दिवसांच्या कठोर उपचारांनंतर मृत्यूवर मात केली असून त्यांना नुकताच रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.**

गुइलेन-बारे सिंड्रोम हा एक दुर्मिळ पण गंभीर ऑटोइम्यून आजार आहे. या आजारात शरीराची प्रतिकारशक्ती स्वतःच्या मज्जासंस्थेवर हल्ला करते. यामुळे हात-पायातील कमजोरी, सुन्नपणा, चालण्यात अडचण, तसेच गंभीर अवस्थेत श्वसन स्नायू निकामी होऊन रुग्णाला व्हेंटिलेटरची गरज भासू शकते. अनेकदा हा आजार व्हायरल किंवा जंतुसंसर्गानंतर दिसून येतो. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू होते. आजाराच्या तीव्र अवस्थेत श्वसन स्नायूंवर परिणाम झाल्याने त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले. मात्र डॉक्टरांचे नियोजनबद्ध उपचार, सतत निरीक्षण आणि उत्कृष्ट टीमवर्कमुळे त्यांना हळूहळू व सुरक्षितरीत्या व्हेंटिलेटरवरून काढण्यात यश आले. या दीर्घकालीन उपचार प्रक्रियेत रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर व नर्सिंग स्टाफने अहोरात्र मेहनत घेतली. या उपचारांचे नेतृत्व अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर, वैद्यकीय अधीक्षक डॉ.दीपक शेजवळ, औषध वैद्यकशास्त्र विभागप्रमुख डॉ.पाराजी बाचेवार आणि श्वसनरोग वैद्यकशास्त्र विभागप्रमुख डॉ.विश्वनाथ पुजारी यांनी केले. तर न्यूरोलॉजिस्ट डॉ.अभिजित पिल्लई, डॉ.गोपाळ घोलप, डॉ.सायली पाटील, डॉ.स्वप्नील चौधरी, डॉ. अमित भंगाळे, डॉ.नेहा चौधरी, डॉ.यतिन बोरोले, डॉ.तेजस कांबळे, डॉ.अंकिता काळे, डॉ. प्रशांत अंधाले, डॉ.प्रतिक्षा औटी, डॉ.तुषार राठोड आणि डॉ.पराग चोले यांनी रुग्णाच्या उपचारात महत्त्वाची भूमिका बजावली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# युवाक्रांती संघटना, तेलखेडी ग्रामस्थांचा उद्या रास्ता रोको

## शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी; तहसीलदारांना दिले निवेदन

प्रतिनिधी । धडगाव

**तालुक्यातील तेलखेडी येथील शेतकऱ्यांना अतिवृष्टीची नुकसान भरपाई तातडीने मिळावी, या मागणीसाठी तसेच प्रशासकीय दिरंगाईचा निषेध करण्यासाठी युवा क्रांती संघटना व तेलखेडी ग्रामस्थांच्यावतीने गुरूवार, दि.५ रोजी रोहजरीपाडा येथील धडगाव-शहादा मुख्य रस्त्यावर 'रस्ता रोको' आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन अक्राणी तहसीलदार यांना देण्यात आले.**

निवेदनात, युवा क्रांती संघटनेने दि.५ जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनानंतरही प्रशासनाकडून आजतागायत कोणतीही समाधानकारक कार्यवाही करण्यात आलेली नाही. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे तेलखेडी गावातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पंचनामे



होऊनही या गावाला जाणीवपूर्वक नुकसान भरपाईच्या बाधित क्षेत्र यादीतून वगळण्यात आले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात उप कृषी अधिकारी विजय भलकारे यांची भूमिका संशयास्पद असून, कथित आर्थिक मागणीमुळेच तेलखेडी गावाला भरपाईपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी निवेदनातून केला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याशिवाय पर्याय उरलेला नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनानेच ग्रामस्थांना बेमुदत रस्ता रोको आंदोलनासाठी मजबूर केले असून या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस व कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नास प्रशासन पूर्णपणे जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

**अशा आहेत मागण्या...**

तेलखेडी गावातील सर्व अवकाळी पीक पंचनाम्यांची तातडीने पुनर्तपासणी करण्यात यावी, त्रिस्तरीय समितीवर गुन्हे दाखल करून संपूर्ण कार्यपद्धतीची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, इतर बाधित गावांना ज्या निकषांवर एकरी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे तेच निकष तेलखेडी गावास लागू करून तातडीने भरपाई मंजूर करण्यात यावी, उपकृषी अधिकारी विजय भलकारे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार व कर्तव्यात कसूर या अनुषंगाने स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्यात यावी, आदी मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

निवेदनावर प्रदेश कार्यकारिणी सदस्य मंगेश वळवी, तालुका प्रमुख लक्ष्मण पाडवी, तालुका संघटक रविंद्र वळवी, संपर्क प्रमुख बावा पावरा, जनसंपर्क प्रमुख अमिताभ वळवी, टेट्या पावरा, पोलीस पाटील माका पावरा, नांज्या पावरा, किसन वळवी, दिलवरसिंग पाडवी, मेरसिंग पावरा, ठुमला पावरा, वसा पावरा यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षरी आहेत.

# धनराज अहिरे यांना 'तात्यासाहेब ज्योतिबा फुले' राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार

प्रतिनिधी । अमळनेर

**महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदेतर्फे देण्यात येणारा तात्यासाहेब ज्योतिबा फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार सावखेडा येथील रहिवासी व दूधखेडा (ता.शहादा) येथील श्री. नागेश्वर माध्यमिक विद्यालयात उपशिक्षक म्हणून कार्यरत असलेले धनराज त्र्यंबक अहिरे यांना प्रदान करण्यात आला.**

या पुरस्कारासाठी संपूर्ण राज्यातून अवघ्या सहा शिक्षकांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये श्री.अहिरे यांचा समावेश होता. जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयातील अल्पबचत भवन येथे पार पडलेल्या या पुरस्कार वितरण सोहळयाला मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. उत्तम कांबळे, शिक्षक आमदार



किशोर दराडे, समता शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डी. के. अहिरे, प्रदेशाध्यक्ष प्रा.भरत शिरसाट यांच्यासह शासकीय अधिकारी, साहित्यिक व मान्यवर उपस्थित होते. सन्मानचिन्ह, शाल, समतांगण विशेषांक, पुस्तके व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

प्रास्तविक करतांना प्रा.भरत शिरसाट यांनी, श्री. अहिरे यांनी आदिवासी जिल्ह्यात राबवलेल्या शैक्षणिक नवोपक्रमांची माहिती देत त्यांच्या विद्यार्थी हितैषी व उपक्रमशील कार्याचा गौरव केला. सूत्रसंचालन परिषदेचे जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब सोनवणे यांनी केले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी प्रकाश तामस्वरे यांच्यासह इतर सहकाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. धनराज अहिरे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत जाधव, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## थोडक्यात

### महापौर, उपमहापौरसाठी प्रत्येकी ३ अर्ज दाखल

**धुळे ।** महापालिका निवडणुकी नंतर आता महापौर आणि उपमहापौर निवडीकडे सगळयांचे



लक्ष लागले आहे. सोमवार, दि.२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत धुळे शहराच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी प्रत्येकी ३ असे एकुण ६ नामनिर्देशन पत्र दाखल झाले. महापौरपदासाठी नगरसेविका गिता तुषार नवले, मायादेवी महादेव परदेशी आणि हसीना बानो साजीद अली अन्सारी यांनी तर उपमहापौरपदासाठी अन्सारी इरफान अहमद फजलु रहेमान, ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील व अमिर असलम पठाण यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केल्याची माहिती मनपा प्रशासनातर्फे देण्यात आली.

### इस्रोच्या अभ्यास दौऱ्यासाठी दोघांची निवड

**सोनगीर ।** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या खाजगी विजाभज प्रवर्गाच्या उच्च माध्यमिक निवासी आश्रमशाळांतील इयत्ता ९ वीच्या ५ मुले व ४ मुली अशा ९ विद्यार्थ्यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. दरम्यान, हे विद्यार्थी बेंगलोर येथे रवाना होत आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सोंडले येथील आश्रम शाळेतील इयत्ता ९ वीचे विद्यार्थी सुमीत सुभाष अहिरे व राज रवींद्र गोपाळ या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव मनोहर पाटील, संचालिका प्रा. हर्षा वाघ, मुख्याध्यापक एस.व्ही. पाटील, प्राचार्य एस.टी. तेले आदींनी कौतुक केले.

### स्वच्छता, पाणीपुरवठ्याची आयुक्तांकडून पाहणी


**धुळे ।** महापालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांनी सोमवार, दि.२ रोजी प्रभाग क्रमांक १ मधील स्वच्छता, पाणीपुरवठा व इतर अनुषांगिक बाबींची पाहणी करुन कॉलनी, वस्त्यांमधील प्रमुख रस्ते दोन दिवसात स्वच्छ करण्याच्या तसेच पाणी गळती रोखण्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी मुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक तसेच प्रभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त, बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता उपस्थित होते.

# नंदुरबारमध्ये बनावट जन्म-मृत्यू दाखला देणारी साखळी उद्ध्वस्त

प्रतिनिधी । नंदुरबार

**पोलिसांनी शहरातील एका सायबर कॅफेवर छापा टाकत याठिकाणी सुरू असलेल्या बनावट जन्म-मृत्यू दाखल्यांची साखळी उघडकीस आणली. नंदुरबार नगरपरिषदेच्या जन्म मृत्यू नोंदणी विभागातील एका कंत्राटी कर्मचाऱ्यासह शिपायाला हाताशी धरुन हे बोगस दाखल्यांचे प्रकरण सुरू असल्याचे समोर आले.**

नंदुरबार शहरातील एका सायबर कॅफेमधून बनावट जन्म-मृत्यूचे दाखले दिले जात असल्याचे उघड झाले आहे. नंदुरबार शहर पोलिसांनी शहरातील शास्त्री मार्केटमधील आर.के. ऑनलाईन सायबर कॅफेची झडती घेतली. याठिकाणी पोलिसांना बनावट शासकीय शिक्के, बनावट दाखले, लॅपटॉप, प्रिंटर असा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी सायबर कॅफेच्या मालकासह एकाला अटक केली. सायबर कॅफे मालक आणि इतर दुसरी व्यक्ती ही नंदुरबार नगरपरिषदेच्या जन्म-मृत्यू विभागात कंत्राटी कर्मचारी




म्हणून कार्यरत होती. शासनाचे जीर्ण झालेल्या दस्ताऐवजांमधील नोंदी खोट्या पध्दतीने टाकून त्यावर नगरपालिकेचो बनावट सही-शिक्के मारुन त्यावर नगरपालिकेची डिजीटल स्वाक्षरी करुन हे जन्म-मृत्यूचे दाखले नागरिकांना बनवून दिले जात होते. याबाबत सखोल चौकशी केल्यानंतर नंदुरबार नगरपरिषदेच्या याच विभागातील एक शिपाईसह दोन जणांचा सहभाग आढळून आला. याप्रकरणी फिर्यादी युवराज चव्हाण (वय-५६, स्वच्छता निरीक्षक, तथा अतिरिक्त कार्यभार जन्म-मृत्यू नोंद विभाग, नंदुरबार नगरपरिषद) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा सर्व प्रकार पाच ते सहा वर्षापासून सुरु असल्याचे देखील सांगितले जात आहे. या प्रकरणात आर.के सायबरचे मालक रिजवान खान सुभान खान, नंदुरबार नगरपरिषदेमधील कंत्राटी कर्मचारी अनिल कोळी, नंदुरबार नगरपरिषदेचे शिपाई लाला ऊर्फ मोहम्मद अली मोहम्मद युसूफ पटेल , शेख शफिक शेख इसाक कुरेशी, आर. के. सायबर कॅफेचा दुसरा मालक इमरान याकूब पिंजारी अशा पाच जणांना अटक केली आहे. त्यांची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

# धरणगावात 'माधुरी फिल्म प्रोडक्शन'चा शुभारंभ

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील धरणी बाजारातील राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले स्मारकजवळ माधुरी फिल्म प्रोडक्शनचा शुभारंभ सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.**

फिल्म प्रोडक्शनचे उद्घाटन माळी समाजाचे अध्यक्ष व्ही.टी. माळी व सामाजिक कार्यकर्ते विजय महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी.डी. पाटील, नगरसेवक परमेश्वर महाजन, लक्ष्मण महाजन, पवन महाजन आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या



सुरुवातीला मान्यवरांच्याहस्ते राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले स्मारकाचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी 'बरबाद केलं गं तू' या गाण्याचे चित्रीकरण धरणगाव शहरात पूर्ण झाले असून लवकरच माधुरी फिल्म प्रोडक्शनच्या चॅनलवर हे गीत प्रदर्शित होणार असल्याची माहिती दिग्दर्शक समाधान माळी यांनी दिली. कार्यक्रमास अभिनेत्री स्वीटी साळुंखे, अभिनेता अक्षय दाभाडे, मॉडेल दिघू यांच्यासह संपूर्ण चित्रीकरण टीम उपस्थित होती. प्रास्ताविक दिग्दर्शक समाधान माळी यांनी केले.

# संत शिरोमणी रविदास महाराज यांना अभिवादन

प्रतिनिधी । धुळे

संत शिरोमणी रविदास महाराज जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी मान्यवरांसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला आ.अनुप अग्रवाल, कृपेश नांद्रे, नगरसेविका संध्या कदम, सागर कांबळे, कमलाकर पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आ.अनुप अग्रवाल यांच्याहस्ते संत रविदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



# महिलांसाठी गर्भाशय, स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे १० रोजी आयोजन

प्रतिनिधी । धरणगाव

**महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशय व स्तन कर्करोगाचे वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने रोटरी क्लब धरणगावतर्फे मंगळवार, दि.१० रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान नगरपालिकेच्या मुख्य इमारतीजवळ विनामूल्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

या शिबिराचा लाभ ३५ ते ६० वयोगटातील महिलांना घेता येणार असून, कर्करोगाचे वेळेत निदान झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

शिबिरात महिलांसाठी स्तनांची सखोल तपासणी, गर्भाशय कर्करोगासाठी पॅपस्मिअर चाचणी, आवश्यकतेनुसार मॅमोग्राफी तपासणी करण्यात येणार आहे. डॉ. मनोज अमृतकर, डॉ. अतुल शिंदे, डॉ. सचिन पेंढारे, डॉ. अभिजित पाटील, सुधाकर वाणी व उदय पाटील यांचे सहकार्य लाभणार आहे. हा सामाजिक उपक्रम रोटरी क्लब धरणगावच्या सर्व सदस्यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आला असून, महिलांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लबचे सदस्य डॉ. अतुल शिंदे यांनी केले आहे.

# खंडेराव महाराज मंदिर सुशोभिकरणासाठी ५० लाख मंजूर

प्रतिनिधी । पारोळा

**श्रीखंडेराव महाराज मंदिर परिसरात सुशोभिकरणासाठी ५० लाखांच्या कामांना मंजुरी दिली आहे. यापुढेही या परिसराच्या विकासासाठी कटिबध्द राहील, अशी ग्वाही आ.अमोल पाटील यांनी दिली.**

पारोळा शहरातील डी. डी. नगर २ या भागात श्री खंडेराव महाराज यांच्या यात्रा उत्सवाच्या कार्यक्रमप्रसंगी आ. अमोल पाटील व लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, शिवसेना



शहरप्रमुख तथा नगरपरिषदेचे गटनेते व नगरसेवक अमृत चौधरी, शेतकी संघाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र पाटील, नगरसेवक मनोज जगदाळे, छोटू पाटील, अमोल शिरोळे, मनीष पाटील, पंकज मराठे, विवेक पाटील, दगडू पवार सोमनाथ देशमुख आशाताई राजपूत यासह नारीशक्तीची उपस्थिती लाभली होती. या सोहळ्यानिमित्त उपस्थित भाविक बांधवांना संबोधित करताना सांगितले की, आम्हाला याप्रसंगी येऊन खूप छान वाटले तसेच आमचे भाग्य आम्हाला काही मदत करता येईल का? अशा धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आपल्या समाजाला एकत्र बांधतात. श्रद्धा, सेवा आणि सद्भावनेतूनच समाजाची खरी प्रगती साधता येते. श्री खंडेराव महाराजांचे शुभाशिर्वाद आपल्या सर्वांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवतील. श्री खंडेराव महाराज मंदिर परिसरात गार्डन, सभागृह यासह अन्य सुशोभीकरणाची कामे करण्यासाठी काम मंजूर करून देण्याची मागणी केली. याची दखल घेत आज या कार्यक्रमप्रसंगी ५० लक्ष रुपयांचा काम मंजूर केल्याचे आश्वासित केले. खंडेराव महाराज मंदिर ट्रस्ट, संयोजक मंडळातर्फे आ. अमोल पाटील यांचे आभार मानले.

# अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचा भक्तिमय वातावरणात समारोप

## माऊली वारकरी शिक्षण संस्थेच्यावतीने आयोजन; १५ हजार भाविकांनी घेतला खीर, पुरणपोळीच्या महाप्रसादाचा लाभ

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील हनुमाननगर परिसरात माऊली वारकरी शिक्षण संस्थेच्यावतीने स्व. सुखनिवासी सद्गुरू जोग महाराज यांची पुण्यतिथी तसेच त्रितपपूर्ती सोहळ्यानिमित्त आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचा भक्तिमय वातावरणात समारोप झाला.**

या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत व ख्यातनाम कीर्तनकारांची उपस्थिती लाभली. सप्ताहादरम्यान, हभप अशोक महाराज सत्रे, हभप विश्वनाथ महाराज कोल्हे, हभप संतोष महाराज आढावणे, हभप ज्ञानेश्वर महाराज, हभप विनोद कृष्णशास्त्री महाराज तसेच हभप उद्धव महाराज चोले यांची कीर्तने झाली. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी श्री १००८ महामंडलेश्वर हभप महंत अनंतदासजी महाराज




कजवाडेकर यांनी काल्याचे कीर्तन झाले. या कीर्तनातून त्यांनी श्रीकृष्ण चरित्र व भक्त आणि भगवंतातील अतूट नात्याचे भावस्पर्शी वर्णन केले.

या कीर्तन सोहळ्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील, शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, कॉन्ट्रॅक्टर भगवान महाजन, उद्योजक सुरेश चौधरी, नगराध्यक्षा लिलाबाई चौधरी, नगरसेवक निलेश चौधरी, माजी जि.प. सदस्य प्रतापराव पाटील, नगरसेवक विनय भावे, कैलास माळी, विलास महाजन, माळी समाज अध्यक्ष व्ही.टी. माळी यांच्यासह सर्व नगरसेवक व भाविकांचे सहकार्य लाभले. महंत हभप श्री. १००८ महामंडलेश्वर भगवानदाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेला हा उपक्रम ३६ व्या वर्षी यशस्वीरीत्या संपन्न झाला. यानिमित्त सुमारे १५ हजार भाविकांनी खीर व पुरणपोळीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला. सप्ताहाच्या दैनंदिन कार्यक्रमात काकडआरती, ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद् भागवत कथा, हरिपाठ व कीर्तन झाले. सप्ताह यशस्वीतेसाठी हभप आर.डी. महाजन, हभप एकनाथ महाराज, डॉ.नरेंद्र पाटील, अमोल महाजन, सुनील चौधरी, राहूल महाराज, जितू महाराज व हनुमाननगर मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. माऊली वारकरी शिक्षण संस्थेचे विश्वस्त व ग्रामस्थांतर्फे या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

# पं. दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठातर्फे अनिल पालिवाल यांना पीएच.डी पदवी प्रदान

## नवी दिल्ली येथे ६० विद्वानांचा 'विद्या वाचस्पती', 'सारस्वत सन्मान' देऊन केला गौरव

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या पं. दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ, वृंदावन धाम (मथुरा) यांच्या वतीने १ फेब्रुवारी रोजी देशाची राजधानी नवी दिल्ली येथे भव्य राष्ट्रीय हिंदी संगोष्ठी व 'विद्या वाचस्पती'सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

नवी दिल्लीतील पंचतारांकित रॅडिसन ब्लू हॉटेलमध्ये आयोजित या भव्य कार्यक्रमात देशातील विविध प्रांतांतून आलेल्या विद्वानांना पदक, प्रशस्तीपत्र व शाल प्रदान करून 'विद्या वाचस्पती' तसेच 'विद्या सारस्वत सन्मान' देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्याचे मुख्य पाहुणे म्हणून राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यापीठ, झांसीचे माजी कुलगुरू पद्मश्री डॉ.अरविंद कुमार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंदुभूषण मिश्रा हे होते. तसेच भारतीय जनता पार्टी (छत्तीसगड) चे प्रदेश उपाध्यक्ष प्रबल प्रताप सिंह जू देव यांची विशेष उपस्थिती लाभली. मुख्य वक्त्या म्हणून शिक्षणतज्ज्ञ व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. ऋतु दुबे तिवारी उपस्थित होत्या. उत्तर मध्य रेल्वे, रेल्वे मंत्रालय भारत सरकारचे सदस्य डॉ. शिवाजी रामभाऊ शिंदे तसेच इस्पात मंत्रालय भारत सरकारचे माजी सदस्य डॉ. कुलवंत सिंह सलुजा यांची विशेष उपस्थिती कार्यक्रमास लाभली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते मंत्रोच्चारासह दीपप्रज्वलन करून करण्यात आली. सन्मानित विद्वानांना मार्गदर्शन करताना मुख्य अतिथी पद्मश्री डॉ. अरविंद कुमार यांनी सांगितले की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४३(१) नुसार हिंदीला भारताची राजभाषा घोषित करण्यात आले आहे. संविधानात हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता देण्याचा विचार होता. हिंदी भाषेची वाढती लोकप्रियता लक्षात घेता तिला राष्ट्रभाषेचा दर्जा देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.



महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार अनिलकुमार पालीवाल यांना पीएच.डी. प्रदान करताना मुख्य अतिथी पद्मश्री डॉ. अरविंद कुमार, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंदुभूषण मिश्रा, समन्वयक डॉ. शिवाजी शिंदे, मुख्य वक्त्या डॉ. ऋतु दुबे तिवारी, भाजप नेते प्रबल प्रतापसिंह जू देव आदी मान्यवर. (छाया : धनंजय धर्मसेना, रायपूर)

**विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंदुभूषण मिश्रा यांनी सांगितले की, हिंदी लेखन, शिक्षणाचा विकास, पर्यावरण जनजागृती, वैद्यकीय सेवा, विधी सहाय्य व समाजसेवा या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा सारस्वत सन्मान प्रदान केला जातो.**

मुख्य वक्त्या डॉ. ऋतु दुबे तिवारी यांनी युवापिढीने हिंदी भाषेचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन केले. या सन्मान सोहळ्यात देशातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ, लेखक, शिक्षक, साहित्यिक व विद्वानांनी हिंदी भाषेच्या उन्नतीसाठी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यापीठातर्फे उपस्थित मान्यवरांना स्मृतिचिन्ह व अंगवस्त्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आचार्य जानकी बल्लभ शास्त्री यांनी केले.

## थोडक्यात

### भालोद महाविद्यालयाच्या सायन्स क्लबचा आऊटरीच उपक्रम

**यावल ।** तालुक्यातील भालोद परिसरातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये तसेच समाजात विज्ञान विषयाबद्दल आवड व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने येथील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर कोल्हे यांच्या संकल्पनेतून सायन्स क्लबतर्फे सायन्स ऑऊटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या सायन्स क्लब अंतर्गत येथील महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाच्यावतीने येथीलच न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी एक ज्ञानवर्धक व उपयुक्त सायन्स ऑऊटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आला. न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक आर. एस.जावळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमात डॉ. गणेश चौधरी यांनी केमिस्ट्री इन मेडिसिन अँड हेल्थ याविषयावर मार्गदर्शन केले. तर प्रा. डॉ. पद्माकर सावळे यांनी ट्युनिंग फॉर्कचे प्रात्यक्षिक सादर करत कंपनांमुळे ध्वनी कसा निर्माण होतो, हे प्रयोगातून समजावून सांगितले.

# चोपडा तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत यश



प्रतिनिधी । चोपडा

**किसान विद्या प्रसारक संस्था, शिरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या एफ–झोन क्रीडा स्पर्धेत महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित, श्रीमती शरच्चंद्रिका सुरेश पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (इंजिनिअरिंग पॉलिटेक्निक), चोपडा महाविद्यालयाच्या बास्केटबॉल संघाने नुकतेच घवघवीत यश संपादन केले.**

या स्पर्धेत चोपडा महाविद्यालयाच्या संघाने जीएमसी पॉलिटेक्निक शहादा या प्रतिस्पर्धी संघावर ६–५ अशा अटीतटीच्या फरकाने मात करत विजेतपद पटकावले. विजयी संघात गुणवंत सावळे, हर्षल भोई, मयूर सुतार, दीपक बडगुजर, यश अहिरे, द्रौणाचार्य कोळी, मोहित माळी व मयूर भोई या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब अँड संदीप सुरेश पाटील, संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.व्ही. एन. बोरसे यांनी विजयी संघाचा सत्कार करून अभिनंदन केले व त्यांच्या भावी क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या संघाला प्रा.एस.एम.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या मेहनतीमुळे आणि मार्गदर्शनामुळे हे यश संपादन झाले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.प्रसंगी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकुलखेडा येथे संत शिरोमणी रविदास महाराज जयंती साजरी

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अकुलखेडा येथे संत शिरोमणी रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.**

यावेळी माजी सभापती गोपाळराव सोनवणे, प्रभाकर महाजन, तालुकाध्यक्ष सोपान मोरे, ग्रामपंचायत सदस्य वसंत मोरे, पोलीस पाटील सचिन, संतोष विसावे, उमेश विसावे, सरपंच योगेश पाटील, रवींद्र बाविस्कर, ज्ञानेश्वर मोरे, प्रल्हाद बाविस्कर, रोहिदास सोमवंशी, भरत पाटील, नाना वाघ, रवींद्र महाजन, अनंत महाजन,पूर्ण समाज बांधव ग्रामस्थ उपस्थित होते.

संत शिरोमणी रविदास महाराज यांचे विचार सोपान मोरे यांनी मांडले. तर डोंगरे येथील भजनी मंडळाचे प्रभाकर महाजन यांना पारितोषिक देऊन गोपाळराव सोनवणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पारोळा तालुक्यात आज कॅन्सर व्हॅनद्वारे रुग्ण तपासणी

**पारोळा –** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात ३ व ४ फेब्रुवारी रोजी र कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅन मार्फत कर्करोग रुग्णांची तपासणी कॅंसर व्हॅनद्वारे करण्यात येणार आहे. तालुक्यातील तामसवाडी, शिरसोदे, मंगरूळ, शेळावे या प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देण्यात येऊन रुग्णांची तपासणी करण्यात येणार असल्याची देण्यात आली आहे. नाशिक सहाय्यक संचालक (वै) आरोग्य सेवा, परिमंडळ यांच्या आदेशान्वये दि.१ ते ३० फेब्रुवारी या दरम्यान सर्व प्राथमिक केंद्रांवर तपासणी करण्यात येणार आहे.

# जि.प.शाळा लोकसहभागाच्या रंगांनी उजळली

प्रतिनिधी । रावेर

**शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर या उक्तीला साजेसा लोकसहभागाचा दीप विवरे बु. (ता. रावेर) येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत उजळला. गावकऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून शाळेला नवसंजीवनी लाभली आहे. रंगकाम, दुरुस्ती व विविध विकासकामांमुळे ही शाळा केवळ भिंतींनीच नव्हे तर माणुसकीच्या रंगांनीही अधिक सुंदर झाली आहे.**

जिल्हा परिषद समूह साधन केंद्र शाळा विवरे बु.!! शिक्षणाच्या पवित्र कार्यासाठी पुढे सरसावलेले माजी सरपंच धनजी लढे यांनी ११ हजार, सोसायटीचे चेअरमन बेंडाळे यांनी १३ हजार, ग्रामपंचायत सदस्य व सामाजिक कार्यकर्त्या पूनम बोंडे यांनी १५ हजार, माजी ग्रामपंचायत सदस्य व भूजल तज्ज्ञ अरुण पाटील यांनी बांधकामासाठी ६१ हजार रुपयांची भरीव मदत केली. शिक्षक व माजी उपसरपंच तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य शिवाजी पाटील यांनी १५ हजार, विद्यमान उपसरपंच विनोद मोरे ५१०० व ग्रामपंचायत सदस्य ज्योती सपकाळ यांनी ५१०० वर्गणी देत, या उपक्रमात तन–मन–धनाने सहभाग नोंदवला. या सर्वांच्या सहकार्यामुळे शाळेच्या भिंतींना नवे रंग लाभले.

# उत्तर महाराष्ट्रात कॅन्सर रुग्णांकरिता कौन्सिलिंग सेंटर उघडणार : शिकलकर

प्रतिनिधी । चोपडा

**जागतिक कॅन्सर दिनाचे औचित्य साधत उत्तर महाराष्ट्रात कॅन्सर जनजागृती अभियान व कॅन्सर रुग्णाकरिता कौन्सिलिंग सेंटर उघडणार असल्याची माहिती कॅन्सरग्रस्त राज मोहम्मद इस्माईल खान शिकलगर यांनी दिली आहे.**



### जागतिक कॅन्सर दिन विशेष

कॅन्सर असा जीवघेणा आजार ज्याचे नाव ऐकल्यावर भल्या भल्यांची पाया खालची वाळू सरकते. कॅन्सर आज जगात झपाट्याने वाढणारा आजार आहे त्यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे आज घडीला आरोग्यविभाग ,भारत सरकार ,महाराष्ट्र सरकार ,व विविध संस्था या कॅन्सर जनजागृती अभियान लोकांपर्यंत पोहचण्याचे पावले उचलत आहे. आजही ग्रामीण भागात हे अभियान राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात लोकांचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे त्यांना आरोग्यविषयक माहिती देणे गरजेचे आहे.

कॅन्सरग्रस्तांसाठी आपले आयुष्य समर्पित करून जन मानवता बहुउद्देशीय संस्था ,कॅन्सरग्रस्त रुग्ण हेल्प सेन्टर,द्वारे कॅन्सरग्रस्त रुग्णांकरता समुपदेशन करून विविध उपक्रम राबवणार असल्याचे मत शिकलगर यांनी व्यक्त करून कॅन्सरग्रस्त रुग्णांकरता हेल्प सेन्टर द्वारे ते आता उत्तर महाराष्ट्रात व्यापक कॅन्सर जनजागृती मोहीम राबविणार असून आपल्याला मिळालेलं बोनस आयुष्य ते कॅन्सरग्रसतां साठी आधार केंद्राची निर्मिती करून त्या माध्यमातून कॅन्सरग्रस्त रुग्णाची सेवा करण्याचा त्यांचा मानस आहे. कॅन्सरग्रस्त रुग्णाला एस.टी.महामंडळ बस प्रवासात कायमस्वरूपी ७५% तिकीट सवलत, संजय गांधी योजनेतून कॅन्सरग्रस्त रुग्णांना पेन्शन दिली जाते. त्यासाठी उत्पनाचे दाखल्याची अट कमी करावी, अशी मागणी ते महाराष्ट्र सरकारकडे करणार आहेत.

आज कॅन्सरवर चांगल्या पद्धतीने उपचार निघाले आहेत. आपण कॅन्सरवर मात करून त्याला नष्ट करू शकतो. आपले पुढचे आयुष्य आपल्या परिवारा सोबत चांगल्या पद्धतीने जगु शकतो. आपल्या हिंमतीवर सर्व अवलंबून आहे. आपल्याला या आजाराविषयी काही शंका असेल ,समुपदेशन किंवा मार्गदर्शन हवे असेल कॅन्सर हेल्प सेन्टर चोपडा,(जळगाव)येथे संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# नवतंत्रज्ञान कौशल्य अभियान कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेसन अँड लिंकेजस आणि महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय नवतंत्रज्ञान कौशल्य अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे हे उपस्थित होते, तर उद्घाटक म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. संजय पाटील, प्रमुख मार्गदर्शक म्हणून केसीलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे, कार्यक्रम समन्वयक रोशनी जैन व इनोव्हेशन प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक निखिल जाधव हे उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. सूर्यवंशी, महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.एस.ए.वाघ, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. डी. कर्दपवार इत्यादी मान्यवर विचारमंचावर उपस्थित होते. प्रास्ताविक करताना डॉ. डी. डी. कर्दपवार यांनी कार्यशाळेचे उद्देश व महत्त्व सांगून आलेल्या पाहुण्याचा परिचय करून दिला. याप्रसंगी उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना डॉ. संजय पाटील यांनी आजच्या काळात नवतंत्रज्ञान कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या माध्यमातून कौशल्य आत्मसात करून स्वतःच्या जीवनात उपयोगात आणण्यासाठी प्रयत्न करावे, असे सांगितले. यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्र. प्राचार्य प्रा. के. एन. सोनवणे यांनी नवतंत्रज्ञान कौशल्य, उद्योजक वृत्ती बाळगून आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध व्यवसायात भाग घेण्यासाठी स्वतःला तयार ठेवणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख एस.बी. पाटील यांनी केले. या कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी राज्यशास्त्र विभागातील व्ही. बी. पाटील, एस. जी. पाटील व व्ही. व्ही. खैरनार व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# शासन अनुदानासाठी ५ हजारांची लाच स्वीकारताना उपकृषी अधिकाऱ्यासह तिघे जाळ्यात

## शेतकऱ्याला मिळणारी सबसीडी मंजुरीसाठी मागितली होती लाच

प्रतिनिधी । जळगाव

**शासनाच्या कृषी अनुदान योजनेंतर्गत शेतकऱ्याला मिळणाऱ्या सबसीडीसाठी ५ हजारांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने यशस्वी सापळा रचून उपकृषी अधिकाऱ्यासह दोन खाजगी इसमांना लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. ही कारवाई दि.२ फेब्रुवारी रोजी पाचोरा तालुक्यात करण्यात आली.**




याप्रकरणात लोकसेवक लिलाधर शिवाजीराव देशमुख (उप कृषी अधिकारी, वर्ग–३, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाचोरा), संजय प्रभाकर पाटील (धनदाई कृषी केंद्र, आडगाव) व नितीन इंदलसिंग निकम (मजूर) यांचा समावेश आहे. तक्रारदार शेतकऱ्याने शासन योजनेंतर्गत नांगर व रोटर खरेदीसाठी सबसीडी मिळावी, यासाठी ऑनलाईन अर्ज केला होता. आवश्यक साहित्य खरेदी झाल्यानंतर प्रत्यक्ष पाहणी करून फोटो काढून योजनेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याची जबाबदारी उपकृषी अधिकाऱ्यावर होती.

ही प्रक्रिया पूर्ण करून अनुदान मिळवून देण्यासाठी लिलाधर देशमुख यांनी तक्रारदाराकडे ६ हजारांची लाचेची मागणी केली. तडजोडीनंतर ५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले व ही रक्कम संजय पाटील याच्याकडे देण्यास सांगण्यात आले. मात्र दुकानावर संजय पाटील नसल्याने त्याठिकाणी उपस्थित नितीन निकम याने पंचासमक्ष लाचेची रक्कम स्वीकारली.

तक्ररदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

**तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी झाल्यानंतर सापळा रचण्यात आला. कारवाई यशस्वी झाल्याने आरोपींविरुद्ध पिंपळगाव हरेश्वर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक रेश्मा अवतारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.**

# हिंगोणा नगरी श्रीरामाच्या जयघोषात दुमदुमली

प्रतिनिधी । यावल

**तालुक्यातील हिंगोणा येथे सोमवारपासून जयश्री दादाजी मित्र मंडळातर्फे भव्य दिव्य अशा श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे.कथेत श्रीरामाच्या जयघोषाने संपूर्ण गाव दुमदुमले होते.**




श्रीराम कथा आयोजनात कथेच्या प्रवक्ता या महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध श्रीराम कथाकार रामायणाचार्य ह.भ.प रूपालीताई सवणे परतुरकर या आहेत. या कार्यक्रमात अतिशय प्रतिभावंत असे कीर्तनकार आपल्या सात्विक व आध्यात्मिक विचारांनी हिंगोणे ग्रामस्थांना मंत्रमुग्ध करीत आहे. पहिल्याच दिवशी म्हणजे सोमवारी हभप विभीषण ठाकूर महाराज, डोंबिवलीकर यांचे अतिशय सुरेख असे कीर्तन श्रवणाचा लाभ ग्रामस्थांना मिळाला.

कीर्तनात श्रीरामाचा सजीव देखाव्याने ग्रामस्थ भारावले होते. यावेळी श्रीरामाचा जय घोष करण्यात आला.मंगळवारी हभप शिवलीला पाटील सोलापूर यांनी आपल्या जय हिंगोणा कीर्तनात समाज प्रबोधन करून आई–वडिलांची सेवा करण्याचे विचार मांडले.